**<u>प्रेस नोट</u>** दि.१२/०४/२०१९

**ऑनलाईन बँकींगद्वारे गेलेले तब्बल एक लाख रुपये बंडगार्डन पोलीसांनी तात्काळ दिले परत मिळवून**

---

ऑनलाईन बँकींगद्वारे पुणे शहरात व परीसरात नागरीकांची फसवणूक होण्याच्या घटना वारंवार होत असताना श्री. जफर एम. मुसानी, रा. बोटक्लब रोड, नारंगीबाग, पुणे यांचे नोव्हेंबर २०१८ मध्ये बँकेतून बोलत आहे, तुम्हाला रिवॉर्ड पॉईंट्स भेटले आहेत, ते तुम्हाला पाहिजे असल्यास तुम्हाला जो ओटीपी येईल तो मला सांगा असे म्हणून श्री. मुसानी यांचा विश्वास संपादन करुन त्यांचेकडून ओटीपी प्राप्त करुन घेऊन त्यांचे क्रेडीट कार्डवरुन ९९,९३३/- रु. परस्पर काढून घेऊन चोरी केली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर कडील पोलीस उप-निरीक्षक श्री. प्रविण स्वामी व त्यांचे टिमने घटनेचे गांभिर्य ओळखूळ बँकेशी तात्काळ पत्रव्यवहार करुन व बँकेच्या वरिष्ठ अधिका-यांना संपर्क साधून श्री. मुसानी यांचे ऑनलाईन चोरीस गेलेले ९९,९३३/- रु. त्यांना परत मिळून दिले. वरील रक्कम श्री. मुसानी यांचे बँक खात्यात जमा झाल्यानंतर त्यांच्या चेह-यावर समाधान दिसून आले.

सदरची कामगिरी मा. पोलीस उप-आयुक्त श्री. बच्चन सिंग, मा. सहा. पोलीस आयुक्त प्रिति टिपरे, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक एम.एम.मुजावर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक श्री. प्रविण स्वामी व पोना कैलास डुकरे यांनी केली आहे.

**(एम.एम.मुजावर)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे**